**महाराष्ट्र शासन**
**उद्योग संचालनालय**
**जिल्हा उद्योग केंद्र, यवतमाळ**

## सुधारीत बीज भांडवल योजना

बेरोजगार युवक युवतींना या योजनेमध्ये उद्योग/सेवा उद्योग/व्यापार याकरीता रु. २५ लाखापर्यंत कर्ज सुविधा उपलब्ध आहे. उद्योग घटकाचे बाबतीत प्रकल्प खर्चामध्ये स्थिर भांडवली गुंतवणुक व खेळत्या भांडवलाचे सिमांतिक भांडवल अंतर्भुत राहील)

अर्जदारास प्रकल्प खर्चाच्या ५ ते १० % रक्कम स्वत: भरावी लागेल. जिल्हा उद्योग केंद्राकडुन १५ ते २०% रक्कम बीज भांडवल सहाय्य दरसाल दर शेकडा केवळ ६% व्याजदराने मृदु कर्ज म्हणून उपलब्ध होईल व उर्वरीत ७५ % रक्कम बँकेकडुन त्यांच्या प्रचलीत व्याजदराने उपलब्ध होईल.

बीज भांडवल कर्जाचे प्रमाण वित्तिय संस्था/ बँकेनी मंजुर केलेल्या प्रकल्प खर्चाच्या १५% अधिकतम रु.३.७५ एवढे राहील. रु. १० लाखापेक्षा कमी प्रकल्प खर्च असलेल्या प्रकल्पामध्ये अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त व भटक्या जाती/जमाती, इतर मागासवर्गीय जाती व अपंग उमेदवारांना प्रकल्प खर्चाच्या २०% बीज भांडवल अनुज्ञेय राहील मात्र सर्वसाधारण प्रवर्गासाठी प्रकल्प खर्चाच्या १५% बीज भांडवल अनुज्ञेय राहील.

बँकेच्या कर्जासाठी व बीज भांडवल कर्जासाठी स्थावर मालमत्ता असलेल्या दोन व्यक्तींनी जामीन देणे आवश्यक आहे.

बीज भांडवल कर्जाची नियमित परतफेड करणा-या लाभार्थींना देय व्याजामध्ये ३% सुट देण्यात येईल्.

बीज भांडवल कर्जाची परतफेड करण्याचा कालावधी - उद्योगासाठी ३ वर्षे विलंबावधी धरुन ७ वर्षे व व्यापार सेवा उद्योग व वाहतुक व्यवसायासाठी ६ महिने विलंबावधी धरुन ४.५ वर्षे एवढा राहील.

बीज भांडवल कर्जाची रक्कम थकीत झाल्यास थकीत रक्कमेवर द.सा.द.शे. १% दराने दंडव्याज आकारण्यात येईल.

चालु असलेल्या उद्योग / व्यापार/ सेवा उद्योग या करीता व त्याचे वाढीकरीता ही योजना लागू होणार नाही.

**पात्रता -**
१) अर्जदार किमान ७ वा वर्ग उत्तीर्ण असावा
२) अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्षे दरम्यान असावे
३) अर्जदार हा महाराष्ट्राचा १५ वर्षापासून रहिवासी असावा
४) अर्जदार हा कोणत्याही वित्तिय संस्थेचा/बँकेचा थकबाकीदार नसावा.
५) अर्जदार हा बेरोजगार असावा
६) अर्जदाराने यापुर्वी शासनाच्या कोणत्याही योजनेअंतर्गत स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल व व अनुदान घेतलेले नसावे

**कर्जप्रकरणास लागणारी आवश्यक कागदपत्रे** - (साक्षांकित केलेली खालील कागदपत्रे २ प्रतीत अर्जासोबत जोडावीत)

१) सेवायोजन कार्यालयाचे नोंदणीपत्र

२) ७ वा वर्ग उत्तीर्ण असल्याबाबत गुणपत्रीका किंवा ७ वा वर्गानंतर अंतिम परीक्षेची गुणपत्रीका

३) अंतीम शाळा/कॅालेज सोडल्याचा दाखला

४) अनु.जाती, अनु.जमाती, विमुक्त व भटक्या जाती/जमाती, इतर मागासवर्गीय जाती पैकी असल्यास सक्षम अधिका-याकडून प्राप्त केलेले अपंगत्वाचे प्रमाणपत्र

५) अपंग असल्यास सक्षम अधिका-याकडून प्राप्त केलेले अपंगत्वाचे प्रमाणपत्र

६) पासपोर्ट साईज फोटो

७) रेशनकार्ड /अधिवास प्रमाणपत्र/मतदान ओळखपत्र

८) विहीत नमुन्यात स्टॅम्प पेपरवर मे.तहसीलदार यांचेसमोर केलेले प्रतिज्ञापत्र

९) भागीदारी असल्यास भागीदारी करारनामा खाजगी मर्यादीत कंपनी असल्यास कंपनी नोदणी प्रमाणपत्र , सहकारी संस्था असल्यास संस्था नोंदणी प्रमाणपत्र

१०) जागेचा भाडेपटटा /संमतीपत्र किंवा जागा स्वतःची असल्यास जागेचा मालकी पुरावा

११) जागेची टॅक्स पावती / ७/१२ उतारा (जेथे व्यवसाय/उद्योग लावावयाचा आहे त्या जागेची)

१२) उद्योग/सेवा उद्योग असल्यास संबधित ग्रामपंचायत / नगर परीषदेचे नाहरकत प्रमाणपत्र

१३) उद्योग/सेवा उद्योग असल्यास लघु उद्योग नोंदणी प्रमाणपत्र

१४) यंत्रसामुग्री/हत्यारे /अवजारे /फर्निचर चे दरपत्रक

१५) प्रकल्प अहवाल

१६) उद्योगासाठी बांधकाम करावयो असल्यास बांधकामाचा ग्रामपंचायत/नगरपरिषद मान्यताप्राप्त नकाशा व खर्चाचे अंदाजपत्रक

१७) उद्योग/व्यवसायाचे अनुषंगाने इतर परवाने दाखले - जसे वाहन चालविण्याचा परवाना, प्रवासी वाहतुकीचा परवाना, बॅच नंबर, कृषि केंद्रासाठी जिल्हा कृषि अधिका-याचा परवाना, स्टोन क्रशर साठी खणीकर्म विभागाचा परवाना, विटा उद्योगासाठी तहसील कार्यालयाचा परवाना, प्रदुषण नियंत्रण मंडळाचे प्रमाणपत्र, विज मंडळाचे विज पुरवठा उपलब्धतेबाबत प्रमाणपत्र इत्यादि.

**टीप** - कर्जप्रकरण सादर करतांना कागदपत्राच्या मुळ प्रती सोबत आणणे आवश्यक आहे.

बीज भांडवल कर्ज योजना प्रकरणासोबत सादर करावयाचा
शपथपत्राचा नमुना (मे. तालुका दंडाधिकारी यांचे समोर केलेले)
(रुपये २०/- चे स्टॅम्प पेपरवर)

**- शपथपत्र -**

प्रतिज्ञक - श्री/श्रीमती /कु. ---------------------------------------------------------------------------------
वय ---------- वर्ष सध्याचा व्यवसाय ------------------------
रा. ----------- पो. ---------------- ता. ----------------- जि. यवतमाळ

मी सत्य प्रतिज्ञेवर निवेदन करतो/करते की,

१. मी इयत्ता -------------- पास असुन माझी जन्मतारीख ------------ ही आहे . माझे वय आजमितीस --------- वर्ष आहे.

२. मी सध्या बेरोजगार आहे/ मी सध्या शासकीय/ खाजगी संस्थेत नोकर असून माझे कर्ज मंजुर झाल्यानंतर बीज भांडवल कर्ज वितरणाच्या वेळेस मी नोकरी सोडून देईन.

३. मी कोणत्याही प्रकारचा व्यवसाय/उद्योगामध्ये, वैयक्तिक/भागीदार/ संस्थेत सहभागी नाही.

४. मी अविवाहीत आहे. मी विवाहीत असून माझे लग्नापुर्वीचे नाव कु. -----------------------------------------------

--------------------------------------- असे होते.

५. मी महाराष्ट्र शासनाचा बीज भांउवल योजनेअंतर्गत कर्ज घेण्यास इच्छुक असून मी ------------------------------------ उद्योग/व्यवसाय/वैयक्तिक/भागीदारी/खाजगी मर्यादीत संस्थेमधील संचालक/सहकारी संस्थेचा सभासद म्हणुन सुरु करणार आहे.

६. आमचे भागीदारी फर्म/खाजगी मर्या.कंपनी/सहकारी संस्थेमध्ये भागीदारी करारानुसार बेरोजगार भागीदार/प्रवर्तक यांचा ---------- % वाटा राहील.

७. मी बीज भांडवल योजनेचे नियम व अटी वाचल्या असून त्या मी पाळीन व तसे बंधन माझ्यावर राहील.

८. मी यापुर्वी स्वयंरोजगार सुरु करण्यासाठी शासनाच्या कोणत्याही योजनेअंतर्गत बीज भांडवल/ अनुदान घेतलेले नाही.

अर्जदाराची सही

पडताळणी

मी वर दिलेली माहिती माझ्या विश्वासाप्रमाणे व समजुतीनुसार सत्य आहे व त्यामध्ये कोणतीही चुक नाही असे निवेदन करतो/ करते.

दिनांक -
ठिकाण - अर्जदाराची सही